# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १३५ वा ❑ भारतीय सौर दिनांक १७ आषाढ शके १९४८, बुधवार दि.०८ जुलै २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### वर्धा गोरस भंडार प्रकरणी एफडीएच्या कार्य पद्धतीवर प्रश्नचिन्ह

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

वर्धा गोरस भंडार प्रकरणी अन्न व औषधी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आणि अधिकाऱ्यांच्या कारवाईवर न्यायालयाने अलीकडेच तीव्र आक्षेप घेतला आहे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखालील एफडीए विभागाने वर्धा येथील ऐतिहासिक गोरस भंडार या दुग्ध संस्थेवर अचानक छापा टाकून दूध संकलन व विक्री बंद करण्याचे आदेश दिले. अस्वच्छतेचे कारण पुढे करत कोणतीही पूर्वसूचना न देता केलेली ही कारवाई एकतर्फी व मनमानी असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने (न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे) नोंदवले.

या प्रकरणी न्यायालयाने एफ डी ए ला सवाल केला ''संस्थेला पूर्वसूचना न देता थेट कारवाई करता, मग जर अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करून कारवाई केली, तर आम्ही अधिकाऱ्यांवर पूर्वसूचना न देता थेट कारवाई करायची का?'' असा संतप्त सवाल न्यायालयाने प्रशासनाला विचारला आहे. तसेच, गेल्या ७० वर्षांत या संस्थेची तपासणी किती वेळा करण्यात आली, असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला.

वर्धा मधील गो दुग्ध उत्पादक सहकारी संस्थेच्या मार्फत संचालित गोरस भंडारवर अन्न व औषधी प्रशासनाने ३१ मे २००२६ रोजी अचानक छापा टाकला. या धडक कारवाईत तब्बल २५ लाख ८६ हजार १६८ रुपयांचा संशयास्पद व असुरक्षित दुग्धजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला असून, सदर आस्थापना तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले. गोरस भंडारने या कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले. तुकाराम मुंढे यांच्या विभागाद्वारे नोटीस न देता पूर्व कारवाई केल्यावर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मागील ७० वर्षात किती वेळा गोरस भंडारची पाहणी केली आणि कितीवेळा अस्वच्छता आढळली असाही प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला.

गोरस भंडार ही दूध संकलन व वितरण करणारी एक सहकारी तत्त्वावरील गांधींवादी संस्था आहे. शहरातील मगनवाडी परिसरात १९३१ पासून ही संस्था कार्यरत आहे. १० ऑक्टोबर १९६१ मध्ये गो संवर्धन गोरस भंडार या संस्थेची नोंदणी झाली. हजारो शेतकरी आणि गोपालक या संस्थेशी जोडले गेले. गोपालकांसाठी ही संस्था उपजीविकेचे साधन बनली. ज्यांची उपजीविका या गोरस भंडारच्या कामकाजावर अवलंबून आहे त्यांना ही संस्था आधार देत आली आहे.

आजघडीला ८५ गोपालक विविध गावांतून गोरस भंडारमध्ये दूध पुरवितात. तर २५० वितरक हे घरोघरी दूध वितरणाचे काम करतात. ज्यामुळे वर्धा शहरात अनेक घरात दूध पोहचण्यास मदत होत आहे. गोरस भंडार आणि त्यांच्या विविध ८ केंद्रात शेकडो कर्मचारी काम करीत आहे. या संस्थेचा गोरस पाक हा पदार्थ प्रसिद्ध आहे. एफडीएच्या कारवाईने थेट त्यांच्या रोजगारावर परिणाम झाला आहे. दूध विकायचे कुठे आणि घरी ठेवायचे कसे? असा पेच आहे. तर काही गोपालकांनी येथे आणलेले दूध संतापून रस्त्यावर फेकले आहे. काही गोपालकांनी पालकमंत्री पंकज भोयर यांची भेट घेऊन व्यथा मांडली.

१९३८ पासून कार्यरत असलेल्या व खुद्द महात्मा गांधी यांच्या सूचनेने सूरू झालेल्या विख्यात गोरस भंडार या संस्थेवर अन्न व औषधी प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशाने छापा टाकण्यात आला. या संस्थेचे बाजारात असलेले दूध, दही, तूप, खवा, गोरस पाक व अन्य जिन्नस परत बोलावले. कामकाज बंद ठेवण्याचा आदेश झाला. आणि एकच वादळ उठले. गोपालक शेतकरी व गांधीवादी संस्था भाजपला चालत नाही कां, असा टिकेचा सूर सूरू झाला. सोशल मीडियावर तर टिकेचे काहूर उठले.

गोरस भंडार या संस्थेशी जवळपास ६०० पेक्षा जास्त दूध उत्पादक शेतकरी कुटुंबीय जोडले आहे. ही संस्था कोणतीही प्रक्रिया न करता दूध थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविते. या माध्यमातून दररोज सुमारे ९ हजार लिटर दूध वर्धा शहरातील सुमारे ५ हजार ग्राहकांपर्यंत घरपोच पोहोचविले जाते.

दरम्यान, वर्ध्याच्या ऐतिहासिक गोरस भंडारवर अन्न व औषध प्रशासनाने ३१ मे रोजी केलेल्या कारवाईविरोधात संस्थेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली.

विशेष म्हणजे यापूर्वीही विविध प्रकारच्या तपासण्या, परवाने रद्द करणे किंवा उत्पादने बाजारातून मागे घेण्याच्या (उदा. जॉनसन अँड जॉनसन बेबी पावडर) प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाने एफ डी ए ला सुनावणीची योग्य संधी देण्याचे आणि पारदर्शक पावले उचलण्याचे निर्देश दिले होते. एफडीए कारवाईच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता राखण्यासाठी न्यायालयाने यापुर्वी महत्त्वाचे निर्देश दिले होते. सुनावणीची संधी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार, कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी किंवा परवाना रद्द करण्यापूर्वी संबंधित कंपनीला आपले म्हणणे मांडण्याची आणि पुरावे सादर करण्याची पूर्ण संधी एफडीएला देणे बंधनकारक असते.पारदर्शक पावले : उत्पादनांच्या चाचणीचे अहवाल आणि नमुने गोळा करण्याच्या पद्धती पारदर्शक असाव्यात. तसेच, घेतलेल्या निर्णयामागील वैज्ञानिक कारणे स्पष्ट असणे आवश्यक आहे. बाजारातून मागे घेणे : उत्पादने बाजारातून मागे घेण्याचे निर्देश देताना घाईगडबडीत निर्णय न घेता, नियमांनुसार योग्य ती कारणमीमांसा असणे गरजेचे असल्याचे न्यायालयाने यापूर्वी स्पष्ट केले आहे.अशा प्रकरणांमध्ये एफडीएला ड्रग्ज अँड कॉस्मेटिक्स ॲक्ट आणि संबंधित नियमावलीनुसारच कारवाई करणे बंधनकारक असते, जेणेकरून उत्पादनांची गुणवत्ता आणि ग्राहकांची सुरक्षा अबाधित राहण्यासोबतच उद्योगांनाही कायदेशीर संरक्षण मिळू शकेल.

## ढग, समुद्र आणि वाऱ्यांचा खेळ : भारतीय मान्सूनचे विज्ञान

ज्योतिर्मय साहित्य

''समुद्राच्या अथांग कुशीतून निघालेली एक अदृश्य लाट हजारो किलोमीटरचा प्रवास करून भारतातील शेतकऱ्याच्या अंगणात आनंदाचा वर्षाव करेल की काळजीचे सावट आणेल, हे ठरवत असते. आकाशात दिसणारे ढग, वाहणारे वारे आणि महासागरातील तापमान यांचा हा अद्भुत खेळ म्हणजेच मान्सून!''

भारत हा मान्सूनवर अवलंबून असलेला देश आहे. आपल्या देशातील सुमारे ७० ते ८० टक्के वार्षिक पाऊस दक्षिण-पश्चिम मान्सूनमुळे पडतो. परंतु हा पाऊस सर्वत्र सारखा पडत नाही. एका बाजूला आसाम, मेघालय, पश्चिम घाट येथे मुसळधार पाऊस पडतो, तर राजस्थान, लडाख आणि विदर्भातील काही भागांमध्ये पावसाचे प्रमाण खूपच कमी असते. काही ठिकाणी ढगफुटीसारखा पाऊस पडतो, तर काही भाग दुष्काळाने होरपळतात. यामागे अनेक कारणे असली, तरी ला नीना, अल निनो आणि सुपर अल निनो यांचा सर्वात महत्त्वाचा वाटा असतो.

**पावसाचे असमान वितरण म्हणजे काय?**

भारतातील प्रत्येक राज्यात किंवा प्रदेशात समान प्रमाणात पाऊस पडत नाही. यालाच पावसाचे असमान वितरण म्हणतात.

याची प्रमुख कारणे अशी आहेत१. हिमालय पर्वताची भिंत २. पश्चिम घाट पर्वतरांग, ३. समुद्रापासूनचे अंतर ४. स्थानिक तापमान ५. हवेचा दाब ६. मान्सून वाऱ्यांचा मार्ग ७. ला नीना आणि अल निनोसारखे महासागरीय बदल

यामुळेच मेघालयातील काही भागांत वर्षाला १०,००० मिमीपेक्षा जास्त पाऊस पडतो, तर राजस्थानमधील काही भागांत २०० मिमीपेक्षाही कमी पाऊस पडतो.

**व्यापारी वारे म्हणजे काय?**

विषुववृत्ताजवळ सूर्यप्रकाशामुळे हवा खूप गरम होते. गरम हवा वर जाते आणि तिची जागा भरण्यासाठी उपोष्ण कटिबंधातून थंड हवा विषुववृत्ताकडे वाहू लागते. या कायमस्वरूपी वाहणाऱ्या वाऱ्यांना व्यापारी वारे (ट्रेड विंड्स) म्हणतात. हे वारे पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात.

प्रशांत महासागरात हे वारे उबदार पाणी इंडोनेशिया आणि ऑस्ट्रेलियाकडे ढकलतात. त्यामुळे पश्चिम प्रशांतमध्ये उबदार पाणी साचते, तर दक्षिण अमेरिकेजवळ थंड पाणी वर येते. हीच परिस्थिती सामान्य मान्सूनसाठी अत्यंत अनुकूल असते.

**ला नीना म्हणजे काय?**

स्पॅनिश भाषेत म्हणजे ''लहान मुलगी''.

जेव्हा व्यापारी वारे नेहमीपेक्षा अधिक जोरात वाहतात, तेव्हा ते उबदार पाणी आणखी पश्चिमेकडे ढकलतात. परिणामी दक्षिण अमेरिकेजवळ अधिक थंड पाणी समुद्राच्या तळातून वर येते. हीच अवस्था ला नीना म्हणून ओळखली जाते.

**भारतावर परिणाम**

ला नीना असताना - भारतात साधारणपणे चांगला किंवा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता वाढते, मान्सून अधिक सक्रिय राहतो. धरणे भरतात, शेतीला फायदा होतो, भूजलपातळी सुधारते, काही वेळा अतिवृष्टी आणि पूर येण्याची शक्यता देखील वाढते.

म्हणजेच ला नीना हा निसर्गने भारताला दिलेला ''पाण्याचा वरदहस्त'' मानला जातो.

**अल निनो म्हणजे काय?**

स्पॅनिश भाषेत म्हणजे ''लहान मुलगा''.

जेव्हा व्यापारी वारे कमकुवत होतात किंवा काही काळासाठी थांबतात, तेव्हा उबदार पाणी पश्चिमेकडे न जाता पुन्हा मध्य आणि पूर्व प्रशांत महासागराकडे पसरते. त्यामुळे समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान




वाढते. यालाच अल निनो म्हणतात.

**भारतावर परिणाम**

अल निनोच्या काळात - १. भारतातील मान्सून कमकुवत होतो. २. पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता वाढते. ३. दुष्काळ निर्माण होऊ शकतो.

४. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते.५. पिकांचे नुकसान होते. ६. अन्नधान्य उत्पादन घटते.

७. तापमान वाढते.




सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ
मा.उपशिक्षिका कन्या शाळा,
सातारा. फोन :9822749758


मात्र प्रत्येक अल निनो वर्षात दुष्काळ पडेलच असे नाही. कारण हिंद महासागराचे तापमान, स्थानिक हवामान, हिमालयाचा प्रभाव आणि इतर हवामान प्रणाली देखील मान्सूनवर परिणाम करतात.

**सुपर अल निनो म्हणजे काय?**

कधीकधी अल निनो अत्यंत तीव्र स्वरूप धारण करतो. समुद्राचे तापमान नेहमीपेक्षा खूपच जास्त वाढते. या अत्यंत शक्तिशाली अवस्थेला सुपर अल निनो म्हणतात.

या काळात - व्यापारी वारे अत्यंत कमकुवत होतात. समुद्रातील उष्णतेचे वितरण पूर्णपणे बदलते. जगभरातील हवामानावर परिणाम होतो.

**भारतावर परिणाम**

१. मोठ्या प्रमाणावर पाऊस कमी पडू शकतो.

२. अनेक राज्यांत दुष्काळ निर्माण होऊ शकतो.

३. उष्णतेच्या लाटा वाढू शकतात.

४ अन्नधान्य उत्पादन कमी होऊ शकते.

५. पाणीटंचाई वाढते.

६. जंगलातील आगींचे प्रमाण वाढू शकते.

**व्यापारी वाऱ्यांवर होणारा परिणाम**

सामान्य परिस्थिती - व्यापारी वारे नियमित वाहतात.

भारतात चांगला मान्सून पडतो. नीना व्यापारी वारे अधिक वेगाने वाहतात.

उबदार पाणी अधिक पश्चिमेकडे जाते. भारतातील मान्सून अधिक बळकट होतो.

**अल निनो**

व्यापारी वारे कमकुवत होतात. उबदार पाणी पूर्वेकडे परत येते. भारतातील मान्सून दुर्बल होतो.

सुपर अल निनो

व्यापारी वारे अत्यंत कमकुवत होतात. महासागरातील उष्णतेचे संतुलन मोठ्या प्रमाणात बदलते. जागतिक हवामानात मोठे बदल दिसून येतात.

लानीना आणि अल निनो किती वर्षांनी येतात ?

**हे बदल नियमित दरवर्षी होत नाहीत.**

साधारणपणे- दर २ ते ७ वर्षांनी अल निनो किंवा ला नीना निर्माण होऊ शकते. त्यांचा कालावधी साधारण ९ महिने ते २ वर्षांपर्यंत असू शकतो.

काही वेळा एक अल निनो संपल्यानंतर लगेच ला नीना सुरू होते. सुपर अल निनो फार दुर्मिळ असतो. तो अनेक दशकांत मोजक्या वेळाच दिसून येतो. म्हणून हवामानशास्त्रज्ञ वर्षभर समुद्राच्या तापमानावर आणि व्यापारी वाऱ्यांवर सतत लक्ष ठेवतात.

**भारतासाठी याचे महत्त्व**

भारतीय शेती, जलसाठे, वीज निर्मिती, अन्नसुरक्षा आणि अर्थव्यवस्था या सर्वांचा आधार मान्सून आहे. त्यामुळे ला नीना आणि अल निनोची माहिती आधीच मिळाल्यासशेतकरी योग्य पिकांची निवड करू शकतात.

सरकार धान्यसाठा वाढवू शकते.

जलसंधारणाची योजना आखता येते.

दुष्काळ किंवा पुराचा धोका कमी करण्यासाठी तयारी करता येते.

हवामानानुसार पीकविमा आणि सिंचनाचे नियोजन करता येते.

समुद्र, वारे आणि ढग यांचे नाते हे पृथ्वीवरील जीवनाचा श्वास आहे. व्यापारी वारे म्हणजे या निसर्गरथाचे सारथी; ला नीना हा भरघोस पावसाचा आशावादी संदेशवाहक, तर अल निनो हा सावधगिरीचा इशारा देणारा पाहुणा आहे. सुपर अल निनो मात्र निसर्गाच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारी विलक्षण घटना आहे.

आज हवामान बदलामुळे या घटनांचा प्रभाव अधिक गुंतागुंतीचा होत आहे. म्हणूनच जलसंधारण, वृक्षलागवड, पावसाच्या पाण्याचे संकलन, हवामानानुसार शेती आणि वैज्ञानिक अंदाजांचा योग्य वापर हीच भविष्यातील सुरक्षित वाट आहे. निसर्गाचे संकेत समजून घेतले, तर दुष्काळातही आशेचे बी पेरता येईल आणि अतिवृष्टीतही सुरक्षित भविष्य घडवता येईल.


***

## आयुष्यात येणाऱ्या प्रत्येकाच्या संघर्षाची कहाणी – ''लढा''

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर येथील वर्डलँड पब्लिशिंग हाऊसतर्फे लढा नावाचा ठा. धोंडिरामसिंह राजपूत लिखित 'स्त्री साहित्यावर आधारित काव्यसंग्रह प्रकाशित होतोय, त्या निमित्ताने...

'लढा काव्यसंग्रहातील एकेक कविता वाचू लागलो. साहित्यातील एका अनुभव संपन्न हाताने लिहिलेल्या कविता खूपच अर्थपूर्ण असून जीवनात घडून गेलेल्या प्रत्येक लढ्याचे वर्णन कवितेत दिसून येत होतं. त्यात मग स्त्रीच्या जीवनात येणारा लढा, शेतकऱ्यांच्या जीवनातील लढा, अपंगाच्या जीवनातील लढा, शहिदांचा लढा, वृध्दपकाळातील लढा, युवकांचा लढा, सैनिकांचा लढा, शेतातील बांधाचा लढा, लेकीबाळीचा लढा, हुंड्याविरुद्ध लढा, आजाराशी लढा, समस्यांशी लढा, महागाईशी लढा, शहिदांचा लढा, वि. दा. सावरकरांचा लढा, बाबू गेणूंचा लढा, भोंदूगिरीविषयीचा लढा किंवा राजकारणातील लढा हे आणि असे अनेक 'लढे किंवा 'संघर्ष व्यवस्थितपणे काव्यसंग्रहात दिसून येतात. तसेच स्वच्छता, जलसंपत्ती, मुलींचे कर्तव्य, बापाचे कर्तव्य, देशभक्ती, ऑपरेशन सिंदूर, दैवीशक्ती, संस्कार, भ्रष्टाचार, बाप, मानवी धर्म, मराठी भाषा, पहिली शाळा, वटसावित्री पौर्णिमा, आई, महिला सक्षिमीकरण, बालमजूर, रक्तदान, अन्नभेसळ, शेतकरी जीवन, मोबाईलचा वापर, भाकरीचा मानकरी, स्वावलंबन, स्वदेशी वस्तू, आत्मनिर्भता, माहेर, भूक व अन्न असे विविध विषय काव्यसंग्रहात प्रामुख्याने मांडलेले दिसून येतात.




मी मुद्दामहून काव्यसंग्रहातील काही काव्यपंक्तीचा उल्लेख करू इच्छितो, ते म्हणजे स्त्रीत्वाला जन्म घेण्याआधीदेखील किती संघर्षातून जन्म घ्यावा लागतो, हे ठा. धोंडिरामसिंह राजपूत यांनी प्रखरपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. कवी म्हणतात,

आई मला घे
तुझ्या पदरात
नको मारू मला
तुझ्या उदरात
आई बाबा मला
जगी येऊ द्या...
तुम्ही पाहिले जग
मला ही पाहू द्या...

वरील काव्यपंक्ती वाचल्यानंतर डोळे भरून आल्याशिवाय राहत नाही. हेच कवीच्या लेखनाचे विशेष म्हणता येईल. तसेच 'नराधम कवितेत कवी लिहितात,

महिला, मुली, बालिकांची
दिवसाढवळ्या विटंबना
अत्याचार सांगण्यासाठी
होतसे त्यांची कुचंबना
झोपलेले सरकार
झोपलेले कारभारी
याच राज्यात वाढली
नराधमाची व्यभिचारी

या पंक्तीच्या माध्यमातून स्त्रीची होणारी कुचंबना आणि सरकारचा बेजबाबदारपणा यावर कवीने लेखनीच्या माध्यमातून प्रहार केलेला दिसून येतो.

मराठवाडा ही साहित्यिकांची भूमी म्हणून ओळखली जाते. या भूमीने अनेक कवी लेखक मराठी साहित्यास दिले, ही परंपरा अनेक उत्तम साहित्यिकांनी जपलेली आहे. दर्जेदार आणि उत्तम साहित्य निर्मितीसाठी साहित्यिकांकडे विपुल अनुभव, वाचन, गहरी संवेदनशीलता व प्रभावी शब्दसंपदा असावी लागते. या गोष्टी दैवी देणं असतात. कवी ठा. धोंडिरामसिंह राजपूत यांना हे दैवी देणं लाभलेलं असून त्याचा प्रभावी वापर त्यांनी सामाजिक स्वास्थ्यासाठी केला आहे. प्रत्येक मनुष्याला जन्मापासून ते शेवटच्या श्वासापर्यंत विविध व्यक्ती, विचार आणि प्रतिकूल परिस्थितीशी 'लढा' द्यावाच लागतो. प्रत्येक 'लढा देणाऱ्या व्यक्तीसाठी अधिकचे बळ, दिशा व मदत या काव्यसंग्रहातून मिळेल असा विश्वास वाटतो.


परीक्षण
डॉ. विठ्ठलराव जाधव,
(आय.पी.एस.)
विशेष पोलिस महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य. (से. नि.)




ठा. धोंडिरामसिंह राजपूत हे कवी आणि लेखक तर आहेतच त्याबरोबरच ते एक उत्तम कर्ते समाजसेवक देखील आहे. ते मुळचे छ. संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर शहरात वास्तव्य करतात. स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीनंतर १९६७ साली त्यांनी लेखनाला सुरूवात केली. मोठमोठ्या साहित्यिकांच्या सहवासात ते घडत गेले. तसेच विद्यार्थीकेंद्रीत शिक्षणाधिकारी म्हणून देखील त्यांची चौफेर ओळख आहे. आज ते सेवानिवृत्त असले तरी अनेक कार्यक्रम, सामाजिक क्षेत्रात त्यांचा सहभाग वाखाणण्याजोगा असतो. आजपर्यंत त्यांनी पन्नासच्या वरती पुस्तकं लिहलेली असून इयत्ता पाचवी 'स्टेट बोर्ड सुलभ मराठी' या पुस्तकात गेल्या दहा वर्षांपासून राज्यभर विद्यार्थी त्यांची 'बैल पोळा कविता अभ्यासत आहेत. ठा. धोंडिरामसिंह राजपूत यांना सामाजिक कामानिमित्त महाराष्ट्र सरकारचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' व 'पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड समाजभूषण पुरस्कार' तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मिळालेला आहे.

ठा. धोंडिरामसिंह राजपूत लिखित 'लढा काव्यसंग्रह विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, अभ्यासक या सर्वच घटकासाठी महत्त्वपूर्ण आहे. तो नक्कीच प्रत्येकाने अभ्यासावा, त्याचा नक्कीच वाचकाला उपयोग होईल. पुन्हा एकदा अनेक नवोदित साहित्यिकांना हक्काच व्यासपीठ देणारे, मार्गदर्शन, मदत करणारे संपादक मित्र बाबा चन्ने यांचेही खूप खूप कौतुक, अभिनंदन व खूप खूप शुभेच्छा. त्यांनी हे साहित्यकार्य अविरतपणे चालू ठेवावं. जेणे करून नवनवीन साहित्यिक घडतील आणि त्यांच्या साहित्याचा फायदा देशाला होईल. तसेच ठा. धोंडिरामसिंह राजपूत सरांना देखील पुढील साहित्य लेखनासाठी मनापासून शुभेच्छा. त्यांची लेखणी अशीच तेवत राहो, आणि अनेक उत्तमोत्तम व दर्जेदार साहित्य त्यांच्या हातून निर्माण होवो, हीच सदिच्छा. वयाच्या पंचाहत्तरव्या वर्षी देखील त्यांचा साहित्यप्रवास बघून खरच मन भरून आलं.

****




## जात्यावरच्या ओव्या......

आले दिस पेरणी चे
शेतशिवारी आरोळ्या
असा चालला दांगोडा
हळू लागे कान बाळ्या ||७३१||

आले दिस पेरणीचे
लेकराला बांधा झोळी
वारा गायिन अंगाई
झाड घालन झोपी ||७३२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक–भाग ४८




ज्योतिर्मय साहित्य

तिसऱ्या ओळीत समर्थ म्हणतात, ''स्वधर्मेची चाले सदा उत्तमाचा'' म्हणजे आपल्या वाट्याला आलेले काम तोच आपला स्वधर्म समजून जो उत्तम प्रकारे करतो तो भक्त धन्य होय. बऱ्याच वेळा हे जग म्हणजे एक रंगमंच आहे आणि आपण सर्व त्यावरील कलाकार आहोत असे म्हटले जाते. आपल्या वाट्याला जी भूमिका आली असेल ती उत्तम प्रकारे करणे हे आपले काम आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर तोच आपला स्वधर्म आहे तो आपल्याला उत्तम रीतीने निभवता आला पाहिजे. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात.

या सर्वात्मका ईश्वरा ।
स्वकर्मकुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा
। तोषालागी ।।



त्या सर्वात्मक ईश्वराला स्वकर्म कुसुमांनी केलेली पूजा अतिशय प्रिय आहे. म्हणजेच आपले कर्तव्य उत्तम प्रकारे पार पाडणे हे त्याला आवडते. मग तुम्ही मंदिरात किंवा तीर्थयात्रेला गेला काय आणि नाही गेलात तरी चालू शकते. प्रत्येकाने आपले काम जर उत्तम प्रकारे केले तर हीच त्या परमेश्वराची अतिशय चांगल्या प्रकारे पूजा आपण बांधली असे होईल. मग जगामध्ये आपोआपच सज्जनांची मांदियाळी तयार होईल आणि सगळे सुखी होतील. तेव्हाच ऋषींनी सांगितलेले अस्तित्वात येईल

सर्वेऽपि सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयाः।।
सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चिद् दुःखभाग्भवेत।।

सर्व सुखी होतील सर्वांना आरोग्य लाभेल. अर्थात प्रत्येकाने आपले कर्तव्य उत्तम प्रकारे पार पाडले तर... आणि असे वागणारा भक्त जगामध्ये धन्य होईल. भगवंताच्या उत्कृष्ट भक्तांमध्ये त्याची गणना होईल.

स्वसंवाद : १) माझ्या दैनंदिन कामात मी ''देवकाज'' पाहतो का माझे काम म्हणजे परमेश्वराची सेवा आहे असा भाव माझ्या मनात असतो का ? २) ''स्वधर्म'' म्हणजे माझ्या वाट्याला आलेली भूमिका ती मी उत्तम प्रकारे निभावतो का की इतरांच्या भूमिकेकडे माझे लक्ष जास्त असते ? ३) माझ्या नामस्मरणाने किंवा वागण्याने इतर कोणाला परमेश्वराकडे वळण्याची प्रेरणा मिळाली आहे का?.

(क्रमशः)




## ॥ संजय उवाच... ॥




@संजय काव्या पुणे 7743918559

✍ अनुभव

अनुभव हा आपल्या आयुष्याच्या प्रवासातील साथीदार असतो, तो आपल्याला प्रत्येक ठिकाणी मदत करतो, त्याचा वापर आपण कसा करतो हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असते.

## काळजीचे मूळ कर्तेपणात आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आनंद पाहायला आपल्याला दुसरीकडे कुठे जावे लागते का ? नाही. जो स्वत:च आनंदरूप आहे त्याने आपण होऊन ' मी दु:खी आहे ' असे मानून घेतले आहे. एकजण आपले तोंड आरशात पाहायला गेला, पण त्याला ते दिसले नाही. त्यावर दुसरा एकजण म्हणाला, ' मी दाखवितो. ' असे म्हणून आरशावर मळ बसला होता तो पुसून, त्याने आत पाहायला सांगितले, तेव्हा तोंड स्वच्छ दिसले. त्याचप्रमाणे साधू लोक करीत असतात. ते आपल्याला सांगत असतात की, तूच ब्रह्मरूप आहेस; म्हणजे तू स्वत:सिद्ध आणि आनंदरूप आहेस. परंतु आपण काय करतो, की हा प्रपंच माझा आहे असे समजतो, आणि त्यामुळे त्यांतले सर्व सुखदु:ख आपण आपल्यावर लादून घेतो. ज्याने तो उत्पन्न केला त्याला तो रक्षण करण्याची शक्ती असते आणि तो ते आपल्या इच्छेप्रमाणे करीतही असतो; पण तिथे आपल्यावर कर्तेपणा ओढून घेऊन आपण सर्व काळजी करीत बसतो. वास्तविक आपल्या हाती काय आहे ? परमात्म्याला काय करायचे ते तो करीत असतो, आपण मात्र काळजी करून शीण करून घेत असतो. म्हणूनच काळजी सोडून देऊन आपण भगवंताला शरण होऊन राहावे. आपण त्याचे होऊन राहिले म्हणजे आपल्याला सुखदु:ख होत नाही, आणि मग आपल्याला त्या आनंदाचा लाभ मिळतो.

काळजी ही मोठी विलक्षण असते. एका माणसाला आपल्या मुलाला चांगली नोकरी लागावी याची काळजी होती. पुढे त्याच्या मनाप्रमाणे नोकरी लागल्यावर, त्या मुलाच्या लग्नाची काळजी सुरू झाली. काही दिवसांनी लग्न झाले; मग पुढे सून चांगली वागत नाही म्हणून काळजी लागली. नंतर तिला मूल होईना म्हणून काळजी लागली. काही दिवसांनी तिला मूल झाले; त्या मुलाला फिट येऊ लागली म्हणून त्याला काळजी लागली. शेवटी आणखी काही दिवसांनी मुलाची फिट बरी झाली. पण त्या म्हाताऱ्यालाच फिट्स् येऊ लागल्या, आणि अखेर काळजी करीत करीतच तो मरून गेला. काळजी ही आपल्याला भगवंतापासून खरेच काळाच्या स्वाधीन करते. आपण काळाच्या स्वाधीन झालो की आपली बुद्धी भ्रष्ट होते. खरे म्हणजे काळजीचे मूळ माझेपणात आणि कर्तेपणात आहे, आणि खुद्द कर्तेपणाचे मूळ भगवंताच्या विस्मरणात आहे. व्यवहारी माणसे मोठी हुशार असतात; भगवंताला साक्षी ठेवून काळजी करतात ! हा तर त्याच्याहिपेक्षा मोठा गुन्हा आहे. ' काळजी लागणे स्वाभाविक आहे ' ही कल्पनाच आधी आपण मनातून काढून टाकली पाहिजे. आपली काळजी का सुटत नाही ? या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. काळजीने आपल्याला धरण्याच्या ऐवजी आपणच काळजीला घट्ट धरून ठेवतो, मग ती सुटणार कशी ? ज्याने भगवंत आपलासा करून घेतला त्याला काळजीचे कारण उरत नाही.

संकट आले तर काळजी करू नये. भगवंत करतो ते आपल्या हिताचे करतो ही दृष्टी ठेवावी.

***

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे

### आपले सण,आपलेउत्सव वट सावित्री पोर्णिमा

पुढे......
अश्वपती मुलीच्या आग्रहा खातर या विवाहास तयार होतात. ते एके दिवशी आपल्या लवाजम्या सहित सावित्रीने सांगितलेल्या स्थानी, वनात येऊन द्युमत्सेन यांना भेटतात. व त्यांचे पुढे सत्यवानाचा, सावित्रीशी विवाहाचा प्रस्ताव ठेवतात.
द्युमतसेन म्हणतात, आम्ही पूर्वी राजे असलो तरी, आता वनात राहतो. तरुणांना आकर्षण वाटून हा विवाह तुमच्या मुलीला करावासा वाटणे समजू शकते, पण वनात अनेक गोष्टींचा अभाव असतो.
राजमहालात वाढलेली सुख लोलुपते मध्ये व्यस्त असलेली तुमची कन्या, या खडतर आयुष्याला कंटाळेल. म्हणून तुम्ही आधीच हा विचार सोडून द्यावा.
यावर अश्वपती मुलीने घेतलेला निर्धार त्यांना बोलून दाखवतात. यानंतर द्युमतसेनाच्या संमतीने वनातच या दोघांचा विवाह लावून देण्यात येतो.
सावित्री विवाह झाल्यानंतर आपल्या सासू-सासऱ्यांची व पतीची उत्तम प्रकारे सेवा करीत राहते. ती आपल्या कौटुंबिक जीवना बरोबर तप साधनाही करायला लागते. तिचे आपल्या पतीवर अथांग प्रेम होते.
नारादांनी त्याची उर्वरित आयुष्य मर्यादा केवळ एक वर्ष आहे, त्यातील एक एक दिवस कमी होत चालला आहे, हे जाणून ती मनातल्या मनात किंचित घाबरते. असेच करता करता आता तो दिवस उद्यावर येऊन ठेपला. क्रमश:......

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "मातृभाषा:चिंता व चिंतन "

छ.संभाजी नगरमधे महाराष्ट्र राज्यातील पहिली "मातृभाषे-बद्दल चिंतन व संवर्धन" करणे
ऊपाय योजना करणे तसेच कारणे शोधने याविषयी चर्चा संपन्न झाली. तिचा मान अर्थातच जुनी शि.सं.स.भू.ला मिळाला. विद्यालयाच्या भूमकर सभागृहात झालेल्या या परीषदेला सा. अकादमी सदस्य डा.नरेंद्र पाठक, सं.अध्यक्ष वकील, रश्मी बोरीकर मिरगणे शिकतोडसर पाटील कुलकर्णी सर, नागेशसर आदींनी सहभाग घेत विचार मंथन केले. खरतर मराठी आपली माय मातृभाषा व पैजेशी जिंकणारी असून लाखभर मुले (दहावीत). मराठी विषयात अनुत्तीर्ण होणे ही काही बरी गोष्ट नाही आपण कुठे चुकलो, चुकतो.. हे भाषातज्ञ शिक्षिका शिक्षक पालक व अभ्यासक्रम तज्ज्ञ यांनी आवर्जून तपासावे असे वाटते! मातृभाषेला जीवनाशी जोडा, संवर्धन ही
काळाची गरज, पहिलीपासून उच्च वर्गापर्यंत शिक्षक समन्वय.. नुसते अशाने काम
होईल का? तसेच श्रवणवाचन,भाषणलेखन,
पुरकवाचन, विशेषसराववर्ग याबरोबरच वाचनाची कमी, परीक्षा केंद्रित शिक्षण, व कुठेतरी कौशल्य अभाव यात कुठे अपयश येत आहे, असे मी ही एक भाषाशिक्षक म्हणून प्रामाणिकपणे सांगावे
वाटते! का ईतर भाषाचा प्रभाव वाढत आहे? का अभिव्यक्ती व लिखाणात मुले कमी पडतात का?अशाकडेही लक्ष ध्यावे.. तुर्त थांबतो. गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.



## आरोग्य संजीवनी

### उन्हाळ्याचा राजा असलेला आंबा

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

वजन नियंत्रित ठेवण्यास मदत

आंब्यामध्ये फॅट अतिशय कमी असते आणि फायबर जास्त असते. मर्यादित प्रमाणात आंबा खाल्ल्याने पोट जास्त वेळ भरलेले राहते, ज्यामुळे अवाजवी भूक लागत नाही. (पण वजन कमी करायचे असेल तर आंबा मर्यादित प्रमाणातच खावा).

महत्त्वाची टीप : आंबा खाण्याची योग्य वेळ म्हणजे सकाळ किंवा दुपारची वेळ. तसेच, आंबा खाण्यापूर्वी तो काही वेळ पाण्यात भिजवून ठेवणे उत्तम, जेणेकरून त्याची उष्णता कमी होते.

डायबेटीस (मधुमेह) असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच आंब्याचे सेवन करावे.

आयुर्वेदानुसार आंब्याला फळांचा राजा आणि अत्यंत पौष्टिक मानले गेले आहे. विशेष म्हणजे, आयुर्वेदामध्ये पिकलेला आंबा आणि कच्चा आंबा (कैरी) या दोघांचे गुणधर्म आणि शरीरावर होणारे परिणाम वेगवेगळे सांगितले आहेत.

पिकलेल्या आंब्याचे आयुर्वेदिक गुणधर्म

रस (चव): मधुर (गोड)

वीर्य (): शीत (थंड)

दोष: पिकलेला आंबा वात आणि पित्त दोष संतुलित करतो, परंतु कफ दोष वाढवू शकतो (जर जास्त प्रमाणात खाल्ला तर).

धातू वर्धक: आयुर्वेद सांगते की पिकलेला आंबा शरीरातील सप्तधातूंना (विशेषतः रस, रक्त, मांस, मेद आणि शुक्र धातू) पोषण देतो. यामुळे शरीराची ताकद आणि ऊर्जा वाढते.

पिकलेल्या आंब्याचे आयुर्वेदिक फायदे–

वजन वाढवण्यासाठी (बृहण): जे लोक अशक्त आहेत किंवा ज्यांचे वजन कमी आहे, त्यांच्यासाठी पिकलेला आंबा आणि दूध एकत्र खाणे (मँगो शेक किंवा आम्रखंड) उत्तम मानले जाते. हे शरीराला सुदृढ बनवते.

हृदयासाठी हितकारक (हृद्य): पिकलेला आंबा हृदयाच्या आरोग्यासाठी आणि मनाला प्रसन्न ठेवण्यासाठी उत्तम औषध मानला गेला आहे.

रक्त वाढवते: हा शरीरातील रक्त धातू वाढवण्यास मदत करतो, ज्यामुळे ॲनिमिया (रक्ताची कमतरता) दूर होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

कच्च्या आंब्याचे (कैरी) आयुर्वेदिक गुणधर्म: कैरी ही आंबट (अम्ल), तुरट (कषाय) आणि उष्ण (गरम) असते.

दोष: कैरी जास्त खाल्ल्याने पित्त आणि रक्त दोष वाढतात.

फायदा (पन्हे): उन्हाळ्याच्या दिवसात कैरीचे उकडलेले पन्हे (गुळ आणि वेलची टाकून) पिण्याने लू (सनस्ट्रोक ) लागत नाही आणि शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकून राहते.

आयुर्वेदानुसार आंबा खाण्याचे काही नियम:

पाण्यात भिजवून ठेवा: आंबा झाडावरून काढल्यानंतर किंवा बाजारातून आणल्यावर तो किमान १–२ तास पाण्यात भिजवून ठेवावा. यामुळे आंब्याची उष्णता (तीक्ष्णता) कमी होते आणि तो पचायला हलका होतो.

दूध आणि आंब्याचे मिश्रण: आयुर्वेदामध्ये विरुद्ध आहार (एकत्र न खाण्याचे पदार्थ) सांगितला आहे, पण पिकलेला, गोड आंबा हा एकमेव असा अपवाद आहे जो दुधासोबत खाण्यास संमती आहे.

पचनासाठी सुंठ किंवा वेलची: जर आंबा खाल्ल्यानंतर पोट जड वाटत असेल, तर त्यावर थोडी सुंठ पावडर किंवा वेलची खाणे फायदेशीर ठरते.

***

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### प्रवास

जीवनाचा हा प्रवास
अखंडीत राहण्या सुरु
सत्कर्म करावी छान
एकमेका करुन साह्य
संकटे होतील दूर
मनात मिळवावे स्थान

खडतर वाट आहे
जीवन प्रवासाची खरी
जपून सर्वांनी चालावे
दोन प्रेमाचे शब्द
ओठी सदा फुलता
आनंदाला उधाण यावे


# आई-बाबांचं उतारवय...

ज्योतिर्मय साहित्य

नेहमी पेक्षा आज जरा लवकर उठले. उठल्यावर लगेच आईला फोन करून सांगितलं. ''आई आज मी घराकडे येते आहे'' म्हणून. सासर माहेर एका शहरात असल्यामुळे अधून मधून जाणं होत राहतं माहेरी. चहा, नाश्ता, स्वयंपाक, आई बाबांची जेवणं त्यांची औषधं, यांचा डबा, मुलांचा डबा सगळं आवरून आईबाबांना सांगून निघाले ऑफिसला. माहेर म्हटलं की आंतरिक ओढ. ऑफिस संपल्यावर आईकडे निघाले. माझी वाट पाहत आई बाहेर गेटजवळ उभी होती. ऑटोतून उतरताच दोघी एकमेकींना घट्ट मिठी मारली. दोघींचे डोळे पाणावले. आत गेलो.

दिवाणवर बाबा झोपले होते. ''बाबा'' म्हणून आवाज दिला. बाबा लगेच उठले. ''अरे! कधी आलं आमचं बाळ''? बाबांना मी घट्ट मिठी मारली. मी येणार म्हणून आईने पुरणपोळी, आमरस, आमटी, मसाले भात, भजे, कुरडई, पापड असा सगळा स्वयंपाक आधीच करून ठेवला होता. आरामात जेवणं झाली. लगेच मी भांडी कुंडी, किचन आवरून घेतलं. आणि मग आमच्या गप्पा रंगल्या.

आईबाबा दोघेही गप्प गप्प दिसत होते. बाबा डोळ्यात पाणी आणून म्हणाले, ''खूप



अस्वस्थ वाटत आहे. त्रास होतो आहे. दोन पाऊले चालायचं म्हंटलं तरी जीवावर येतं. कशात मन लागत नाही. गत काळातील आठवणींनी डोळ्यातील अश्रू थांबतच नाहीत. हल्ली तूझ्या आईचं शुगर, बी.पी, अंगदुखी, डोकेदुखी काहीं ना कांही चालूच राहतं. घरात आम्ही दोघेच. एकमेकांना बघत उतारवय कसं बसं पुढे ढकलत आहोत. आता वय झालं आमचं. मग हे दुःखणं आलंच. अधून मधून तु येतेस म्हणून तेवढंच बरं वाटतं. तेवढ्यात पदराने डोळे पुसत आई म्हणाली,'' बाळा सुट्टीच्या दिवशी येत जा. तु, लेकरं आली की घर कसं भरून वाटतं''.

संध्याकाळचे सहा वाजले. गप्पांमध्ये वेळ कसा गेला कांही कळलंच नाही. पाणावलेल्या डोळ्यांनी मी सारं घर न्याहाळत होते. घर फार सुनं सुनं वाटत होतं. आईबाबांसारखंच घरंही थकल्यागत वाटू लागलं. आम्ही तिघांनी संध्याकाळचा चहा घेतला. आम्हा सगळ्यांसाठी आईने डबा दिला. मी जड अंतःकरणाने म्हणाले, ''चला आई बाबा मी निघते आता''. मी येत जाईन अधून मधून. काळजी घ्या दोघंही. ये आई! सकाळी लवकर नको उठत जाऊ. दोघंही औषधं वेळेवर घेत जा हं''. मी निघताना बाबा माझ्या हातात दोन हजाराची नोट ठेवत म्हणाले,'' लेकरांना कांही खायला घेऊन जा बाळा''. ''अहो बाबा नको पैसे'' तेवढ्यात घे गं आम्ही असेपर्यंत देत राहू'' असं म्हणत आईने ती नोट माझ्या पर्स मध्ये ठेवली. बाबांनी ऑटो थांबवला. तिघांचे डोळे पाणावलेले. आई बाबा दिसेपर्यंत मी मान बाहेर काढून पाहत होते. गेटजवळ उभ्या आईबाबांना मी डोळ्यात साठवून पुढे निघाले.




खरंच, कसं असतं ना आईवडीलांचं उतारवय ?. थकलेलं शरीर, पांढरे केस, चेहऱ्यावर सुरकुत्या, सुकलेले चेहरे, हळूहळू चालणं, नेहमीचं दुःखणं, शारीरिक व भावनिक त्रास, सतत पाणावलेले डोळे, सतत दवाखाना, नातवंडं सतत जवळ असावीत ही इच्छा. आपल्याला लहानाचं मोठं करण्यात आईबाबा त्यांचं अक्खं आयुष्य पणाला लावलेलं असतं. चुटकीसरशी क्षणात घर आवरणारी आई आज मात्र थकलेली असते. दिवसभर राब राब राबणारे बाबा आज थकल्या अंगानी घरात निपचित पडून असतात. सगळं कसं बदलून जातं. आपल्याला जन्म देऊन लहानाचं मोठं करणारे आई वडील उतारवयात मात्र... उतारवयातील दुःखणं आईवडील एकटेच मुक्याने सोसतात. उतार बयात दोघे एकमेकांचे दुःखणे एकमेकांना सांगत, एकमेकांना आधार देत उतार वयाची गाडी पुढे ढकलत असतात. खरंच, आईवडिलांचं उतारवय बघणं आपल्यासाठी किती वेदनादाई असतं. नाही का?

## ज्ञानेश्वर क.गायके यांच्या सिमेंटच्या जंगलात या कवितेचा विद्यापीठाच्या मराठी अभ्यासक्रमात समावेश

ज्योतिर्मय साहित्य



कन्नड – कन्नडचे सातत्याने लेखन करणारे युवा कवी ज्ञानेश्वर क. गायके यांची कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी. ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासपत्रिका आठवी, सत्र सहावेसाठी मराठवाडी कविता या अभ्यासक्रमात मराठवाड्यातील निवडक कवितेमध्ये सिमेंटच्या जंगलात ही कविता समाविष्ट झाली आहे.

ज्ञानेश्वर गायके यांचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध असून ते उत्तमपणे लेखन करतात. त्यांच्या या साहित्यसेवेची दखल घेऊन त्यांची कविता अभ्यास मंडळातर्फे निवडण्यात आली आहे. कन्नड तालुक्यासाठी हा नव्या पिढीतील कवींच्या कवितेचा सन्मान आहे. कन्नड साहित्यिकांच्या गावातून समस्त तिफण साहित्य परिवार तसेच मार्गदर्शक डॉ. सर्जेराव जिगे, तिफणकार डॉ.शिवाजी हुसे, प्रा.डॉ.विजय भोसले,अॅड.कृष्णा जाधव, डॉ.अंबादास सगट, डॉ. प्रा. प्रतिभा अहिरे, डॉ.संजय गायकवाड तसेच तिफण साहित्य परिवार–अरुण थोरात, सुरेश औटे, जगन्नाथ जाधव, दत्ता मोरस्कर, शिवनाथ गायकवाड, अमोल मोकासे, लक्ष्मण वाल्डे, केशरचंद राठोड, संदीप वाकडे, श्रीराम दाबके, प्रवीण दाभाडे, भिमराव सोनवणे, अविनाश सुसलादे, संदीप कुलकर्णी आदींनी भरभरून शुभेच्छा देऊन त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

त्यांचे प्रकाशित साहित्य – १. पेरणी –काव्यसंग्रह २. पारखं झालं गाव –काव्यसंग्रह, ३. माझ्या गावाची वाट –काव्यसंग्रह

आगामी प्रकाशन साहित्य –१. पाचुंदा–काव्यसंग्रह

२. खारीच्या वावरात–काव्यसंग्रह ३. आठवणी–ललित

''किती किती छान'' ही कविता बालभारतीच्या किशोर अंकात प्रकाशित.



## देणाऱ्याचे हात घ्यावे-प्रा.विठ्ठल बरसमवाड

ज्योतिर्मय साहित्य

पाथर्डी – आज सोमवार दि.६ जुलै २०२६ रोजी महात्मा गांधी विद्यालय येळी ता पाथर्डी येथे कै. लक्ष्मण देवजी जायभाय यांच्या स्मरणार्थ विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. पावसाळ्याचे दिवस असल्याने वाडी वस्तीवरून येणाऱ्या मुलांना पावसाच्या पाण्याचा त्रास होऊ नये, मुले पावसात भिजू नयेत. ही अचूक गोष्ट जाणून शिक्षण प्रेमी श्री अजय जनार्धन जायभाय यांनी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांनाही रेनकोटचे मोफत वाटप केले .

या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान जनार्धन जायभाय यांनी भूषवले. तर प्रमुख पाहुणे म्हणून येळेश्वर संस्थानाचे मठाधिपती ह.भ.प रामगिरी महाराज, व प्रसिद्ध साहित्यिक विठ्ठल बरसमवाड उपस्थित होते. अतिथीच्या शुभ हस्ते विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. ❊देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता, एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे❊ असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक मोफत रेनकोट देणारे श्री अजय जनार्धन जायभाये यांचे कौतुक करताना म्हटले. असे दानशूर व्यक्तींनी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शालेयपयोगी वस्तू दिल्यास ज्ञानमंदिरातील विद्यार्थी उच्चपदस्थ जाऊ शकतात. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत फक्त अभ्यास करावा.अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी येळी येथील ग्रामस्थ जनार्धन लक्ष्मण जायभाये, सौ.कमल जनार्दन जायभाय, श्री दिलीप जायभाये, श्री.तुषार संजय जायभाय ,श्री प्रकाश मुरलीधर बडे ,श्री अमोल जनार्दन जायभाय,

श्री तुकाराम गर्जे ,श्री रोहिदास कराड, श्री शिवाजी कराड,श्री राजेंद्र हंडाळ, सिकंदर शेख,श्री पोपट शेलार, श्री ढोले प्रदीप, सौ.कराड अर्चना,सौ. तळेकर अनिता आणि विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक व राजेंद्र हंडाळ यांनी तर सूत्रसंचालन विजयकुमार चव्हाण यांनी केले. आणि आभार श्री अर्जुन गायकवाड यांनी मांडले.

## लोकांच्या अपेक्षा सोडून द्या आपल्या ध्येयानुसार जीवन जगावे

ज्योतिर्मय साहित्य

जगामध्ये स्व सोडून लोकं नावाचा एक समुदाय असतो. या समुदायाला काय वाटेल याचीच चिंता माणूस सतत करत असतो. अनेक जण या लोकांच्या कल्पनेनुसार जगतात. मी स्वतः ला वाटतं तसा राहिलो तर लोक काय म्हणतील ? मी माझ्या इच्छेनुसार जगलो तर लोकांना काय वाटेल ? मी मनासारखं वागलो तर लोक काय विचार करतील ? असा विचार करूनच आजकाल बहुतांशी माणसं लोकांच्या अपेक्षानुसार जगत आहेत.

याचाच अर्थ जीवन आपण जगत आहोत परंतु त्या जगण्याला काहीच अर्थ नाही. मी जे जीवन जगतो आहे तो मी नाही आणि मी जगलेले जीवन माझे नाही. म्हणूनच या अशा जगण्याला अर्थ नाही. जे जीवन आपल्या स्वतःच्या संकल्पनेनुसार जगले, आपल्या विचार ध्येय आणि उद्देशाच्या निश्चितीनुसार जगले, आपल्याला वाटेल तसे मनाप्रमाणे जगत राहिले, तर ते जीवन आपले म्हणावे.




आता लोक काय म्हणतील याचा विचार सोडून द्यावा. आपण आपल्या स्वतःच्या इच्छा पूर्ण कराव्यात. आपल्या स्वतःच्या आवडीनिवडी आणि मतानुसार आपल्या जीवनाची आखणी करावी. आणि त्यानुसार पुढे चालावे. लोकही पुढे जात आहेत. कोणीही थांबलेले नाही. जग चाललेले आहे. घड्याळाचे काटे थांबलेली नाहीत. आलेला क्षण मागे जात आहे. पुढचा क्षण वर्तमान होत आहे. हातातून निसटलेला क्षण भूतकाळात जात आहे. यामध्ये लोकांच्या इच्छा अपेक्षा कुठे येतात ? आणि त्यांना कुठवर महत्त्व द्यायचं ? हे आपण ठरवायचं.

वाच्यता न करता स्वतःला बदला.लोकं ईर्षेने तळमळतील. जगाला मोठे उत्तर शब्दांनी नव्हे तर परिवर्तनाने द्यायचे असते. तुम्ही दूर जात नाहीत तो पर्यंत त्यांना तुमची किंमत कळत नाही. लोकांना रडून समजावून सांगू नका. ही जाणीव होऊ द्या की त्यांनी काय गमावले आहे.

स्वार्थ असेल तिथे आपलेपणा शोधु नये. फक्त उपयोग पाहिला जातो तिथे प्रेम शोधु नये. उणीव आपल्या निवडीमध्ये असते. लोकं जसे असतात तसेच असतात. आता वेळ आली आहे स्वतःकडे परतण्याची. आत्मकेंद्रित होण्याची.

वर्तमानातच जगून निघावे. निसटलेले क्षण परत येत नाहीत, याचा चांगला अनुभव प्रत्येकालाच आलेला आहे. म्हणून आयुष्याचा उद्देश निश्चित करावा. आपल्या ध्येयपूर्ती कडे प्रामाणिकपणे, स्व–कष्टाने चालावे. रस्त्यात येणाऱ्यांची चिंता नको, कोणाचा विचारू नको, कोणाबद्दल मनात राग,द्वेष नको. आत्मसन्मान असावा, पण अहंकार नको. असंच आपल्या उद्देशाला धरून, प्रामाणिकपणे, नैतिकतेने, धैर्याने, आत्म सन्मानानं उद्देशाकडे ध्येयाकडे जाता येतं. फक्त आपण आत्मकेंद्रीत असावे.

इतरांचा सन्मान आदर असावा परंतु त्यांच्या कल्पनेचा आपल्या जीवनात विचार नको. आपल्या अपेक्षा आणि कल्पनेनुसार लोक जगत आहेत का? हे आपण पाहतच नाहीत. मात्र लोकांना काय वाटते? आपण कसे असावे? म्हणून लोकांना त्यांच्या नजरेत चांगले दिसावे म्हणून आपण एक अभिनयाचे जीवन जगत असतो. आपले स्वतःचे जीवन स्वतःच्या विचाराने आणि आपण निश्चित केलेल्या ध्येयाकरिता जगावे असेच आज या ठिकाणी व्यक्त व्हावे वाटते.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### सुवर्ण मध्य

१: " आपण स्वतः कृती करणे व भगवंताच्या कार्यात सहभागी होणे"
२: "स्वतः काही ही न करता त्याचे कार्य बघता येणे" हे प्रारब्ध आहे का?
कर्म, भक्ती आणि प्रारब्ध यांचा सुंदर मिलाफ !
अध्यात्म आणि भगवद्गीतेच्या प्रकाशात तुमच्या या दोन्ही स्थितींचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल:
१. स्वतः कृती करणे व भगवंताच्या कार्यात सहभागी होणे (कर्मयोग आणि भक्ती)
जेव्हा तुम्ही स्वतःला निमित्त मानता आणि भगवंताच्या कार्यात (म्हणजेच समाजात सत्कर्म करण्यासाठी) स्वतःला झोकून देता, तेव्हा तो 'कर्मयोग' ठरतो.
भगवद्गीतेत श्रीकृष्णाने अर्जुनाला नेमके हेच करायला सांगितले होते–"निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्" (हे अर्जुना, तू फक्त निमित्त बन).
जेव्हा आपण "मी कर्ता नाही, भगवंतच माझ्याकडून करून घेत आहे" या भावनेने काम करतो, तेव्हा अहंकाराचा नाश होतो आणि ते कार्य 'भगवद्कार्य' बनते. ही प्रगतीची आणि जिवंतपणाची लक्षणे आहेत.
२. स्वतः काहीही न करता त्याचे कार्य बघता येणे (साक्षीभाव आणि प्रारब्ध)
दुसऱ्या स्थितीत, जेव्हा परिस्थिती तुमच्या नियंत्रणात नसते किंवा शरीर-मनाने तुम्ही काही करू शकत नाही, अशा वेळी शांत राहून भगवंताची 'लीला' किंवा त्याचे कार्य केवळ उघड्या डोळ्यांनी (साक्षीभावाने) पाहणे, हे 'प्रारब्ध' आणि 'शरणागती' दर्शवते. आयुष्यात अनेक गोष्टी आपल्या हातात नसतात. जे आपल्या प्रयत्नांच्या पलीकडे आहे, त्याला 'प्रारब्ध' किंवा ईश्वरी इच्छा म्हणून स्वीकारणे आणि त्यातही देवाचा काहीतरी चांगला हेतू असेल हा विश्वास ठेवणे म्हणजे साक्षीभाव.
ज्ञानेश्वर माऊली किंवा संत तुकारामांनी सुद्धा अशा स्थितीचे वर्णन केले आहे, जिथे माणूस स्वतःचे कर्तृत्व सोडून पूर्णपणे भगवंताच्या इच्छेवर विसंबून राहतो. थोडक्यात सांगायचे तर:
पहिली स्थिती (कृती): हा तुमचा 'पुरुषार्थ' आहे, जिथे तुम्ही देवाने दिलेल्या शक्तीचा वापर करून त्याचे कार्य करत आहात. दुसरी स्थिती (दर्शन/साक्षीभाव): हा तुमचा 'स्वीकार' आहे, जिथे तुम्ही प्रारब्धाला मान देऊन ईश्वराच्या इच्छेसमोर नतमस्तक होत आहात.
थोडक्यात. माणसाने जेव्हा कर्म करण्याची वेळ असते तेव्हा 'भगवंताचे कार्य' म्हणून ते उत्साहाने केले पाहिजे आणि जेव्हा काहीही करणे शक्य नसते, तेव्हा 'प्रारब्ध' किंवा 'ईश्वरी इच्छा' मानून ते शांतपणे (साक्षीभावाने) पाहिले पाहिजे. यालाच अध्यात्मात संतुलन म्हणतात. क्रमशः.......



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२


### 'बाबा' (सह्याद्रीची ढाल)

पुढे.....
'देणाऱ्याने देत जावे' या अतिशय प्रसिद्ध कवितेत कविवर्य विंदा करंदीकर म्हणतात: हिरव्या पिवळ्या माळाकडून हिरवी पिवळी शाल घ्यावी, सह्याद्रीच्या कड्याकडून छातीसाठी ढाल घ्यावी. या ओळींमध्ये थोडासा भावबदल करून मी असं म्हणेन: प्रेम देणाऱ्या आईकडून मायेची उबदार शाल घ्यावी, घराचे आभाळ पेलणाऱ्या बाबांकडून सह्याद्रीची ढाल घ्यावी!
आपल्याकडे आईची महती सर्वांनीच गायिली आहे, पण त्या मानाने बाबा हे नाते थोडे दुर्लक्षितच राहिले आहे. आजच्या गतिमान युगात कोणी कोणाला क्वचितच पत्र लिहितो. परंतु पूर्वी जेव्हा एकमेकांच्या भावना किंवा सुखदुःखे जाणून घेण्यासाठी पत्राशिवाय दुसरं माध्यम नव्हतं, तेव्हा बाहेरगावी असणारा मुलगा वडिलांना पत्र लिहिताना पत्राची सुरुवात 'तीर्थरूप' या शब्दाने करायचा.
आपली संस्कृती वडिलांना केवढं सर्वोच्च स्थान देत होती, हेच यातून सिद्ध होतं. वडील हे 'तीर्थरूप' म्हणजे तीर्थासारखे पवित्र! त्यांचं छत्र जोपर्यंत शिरावर आहे, तोपर्यंत अन्य कोणत्याही तीर्थक्षेत्री जाण्याची गरजच उरत नाही. 'आईबाप हे दैवत माझे असता माझ्या घरी, कशाला जाऊ मी पंढरपुरी' या सुंदर भावगीतात नेमका हाच विचार सांगितला आहे. आपल्याकडे केवळ एक दिवस 'फादर्स डे' साजरा करण्याची पद्धत नाही; आपली संस्कृती तर रोजच आई-वडिलांना आणि गुरूंना वंदन करायला शिकवते. "मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव" हाच आपल्या जगण्याचा पाया आहे.
आईची कोमलता, प्रेम, माया आणि हळुवारपणा या गुणांच्या पार्श्वभूमीवर बाबांचे थोडेसे विरोधी वाटणारे व्यक्तिमत्व अधिक उठून दिसते. रामगणेश गडकरी ऊर्फ गोविंदाग्रज आपल्या कवितेत महाराष्ट्राचे वर्णन करताना म्हणतात: क्रमशः...

## हाक विठुरायाची वारीची पहिली चाहूल



अमोल बोरीकर



आषाढ जवळ आला की महाराष्ट्राच्या मातीत एक वेगळंच चैतन्य दाटू लागतं. पहाटेच्या शांत वातावरणात टाळ-मृदंगाचा नाद घुमू लागतो, अभंगांच्या ओव्या वाऱ्यावर तरंगू लागतात आणि नकळत मनात एकच ओढ जागी होते–"यावेळी पंढरीला जायचंच!" ही ओढ कोणाच्या आग्रहाने निर्माण होत नाही; ती विठुरायाच्या हाकेने जन्म घेते.ही हाक कानांनी ऐकायची नसते, ती मनाने अनुभवायची असते. लाखो वारकरी संसारातील सुख-दुःख, चिंता आणि थकवा बाजूला ठेवून विठ्ठलाच्या भेटीसाठी घराबाहेर पडतात. त्यांच्या पायांत कष्ट असतात, पण मनात आनंद असतो. कारण ते फक्त पंढरपूरकडे चालत नसतात; ते स्वतःच्या अंतर्मनातील विठ्ठलकडे निघालेले असतात. अनेकांना वाटतं, वारी म्हणजे पंढरपूरला जाणारी यात्रा. पण वारीचा अर्थ त्यापेक्षा कितीतरी मोठा आहे. ती शरीराने चालण्यापेक्षा मनाने बदलण्याची प्रक्रिया आहे.
या वाटेवर चालताना अहंकार मागे पडतो, माणुसकी पुढे येते आणि प्रत्येक अपरिचित व्यक्तीही "माऊली" वाटू लागते.
वारीची खरी सुरुवात पायांनी होत नाही; ती मन नम्र झाल्याक्षणी सुरू होते.ज्याच्या मनाला विठुरायाची हाक ऐकू येते, त्याच्यासाठी प्रत्येक रस्ता पंढरीकडेच जात असतो.
"माऊली!" वारी शिकवते की देव मंदिरात बंदिस्त नसतो; तो प्रेमात, करुणेत, सेवेत आणि माणुसकीत वसतो.
वारी म्हणजे देवाकडे जाण्याचा रस्ता नाही; ती स्वतःमधील देव जागवण्याचा प्रवास आहे.वारी आपल्याला सांगते की देव शोधण्यासाठी दूर जाण्याची गरज नाही; मन शुद्ध असेल तर प्रत्येक ठिकाणी विठ्ठल भेटतो.
–हा प्रवास शरीराचा नसून आत्म्याचा आहे.
विठ्ठलाचे दर्शन काही क्षणांचे असले तरी त्या दर्शनासाठी केलेली वारी आयुष्यभराची प्रेरणा देऊन जाते.
चला, आपणही आयुष्यात एक वारी करूया. पंढरपूरची नाही जमली तरी मनातील अहंकारापासून नम्रतेकडे, स्वार्थापासून सेवेकडे आणि द्वेषापासून प्रेमाकडे जाणारी वारी नक्की करूया. कारण खरी पंढरी बाहेर नसते, ती आपल्या अंतःकरणातच वसलेली असते.
"वारी म्हणजे चालणारी भक्ती, जगणारी माणुसकी आणि प्रत्येक पावलागणिक विठ्ठलाशी जोडणारा जीवनाचा सुंदर प्रवास."


# थोडासा वेगळा विचार, पुन्हा नव्याने

ज्योतिर्मय साहित्य

माणूस हा कुटुंबात राहणारा तसेच समाजशील प्राणी आहे. माणसाला माणसात राहणं आवडतं, प्रत्येकाची स्वभाव, विचार, वागणं वेगवेगळं असलं तरी काही अपवाद सोडता सहसा माणसाला एकटे राहणे, ही कल्पना तो करू शकत नाही. कुटुंबात आई वडील, पती पत्नी आणि मुलं मुली असतात पण काळाप्रमाणे सगळं बदलत जातं.

घरातील पिल्लं भूर उडून जातात, पुढे त्यांची लग्न होतात, मुलगी सासरी जाते तर काही ठिकाणी मुले बाहेरगावी किंवा परदेशी जातात, आणि त्या घरात राहतात ते दोघेच पती आणि पत्नी. दोघात सुरू झालेला संसार पुन्हा दोघांवर येतो. आणि कधी कधी एखादी अशी घटना घडते की दोघापैकी एखादा जातो. तेंव्हा मात्र राहिलेल्या एकट्या स्त्री किंवा पुरुष व्यक्तीला जीवन असह्य होतं, हतबलता वाढते. अशीच एक कथा आहे. जपान मधील एक वयस्कर डॉक्टर व्यक्ती, आपली पत्नी निधन पावल्याने खुप निराश झाली होती. त्यांना एकच पुत्र होता. त्याचे लग्न होऊन तो परदेशी कायमसाठी स्थायिक झाला होता.

आता आपलं उरलेले आयुष्य, एकटेपण कसं काढायचं? कसं जगायचं? या विचाराने ती व्यक्ती खुप नैराश्यात जाऊ लागली होती. डॉ. असल्याने जवळ पैसा, घर आदी गोष्टी होत्या पण जवळचं, आपलं म्हणावं, असं कुणीच नव्हतं. रोजचं जीवन जगणं, त्यांना खुप कंटाळवाणं होत होतं, पण करणार काय?




आयुष्यात सर्व प्रकारचे अनुभव अनुभवणे झाले होते, माणसाची पारख झाली होती, जीवनात सारी सुखे उपभोगणे झाली होती, मात्र आता वयाच्या ८१ व्या वर्षी, एकट्याने काय करायचे? हा विचार सतत त्रास देत होता. तसं आरोग्य मात्र चांगलं होतं. पुढचे २० वर्ष तरी आरोग्यास काही होणार नाही, याची ग्वाही वार्षिक मेडिकल चेक अप मधे येत होती.

त्यांनी कुणी तरी सांगितले की तुम्ही, फ्रंकल यांच्या कडे जा. ते उत्तम मानसोपचार तज्ञ आहेत, ते तुम्हाला योग्य मार्गदर्शन करतील. मग ती डॉ.व्यक्ती त्या मानसोपचार तज्ञ, फ्रंकल यांच्याकडे गेली.

त्या मानोसपचार तज्ञानी त्यांना कोणताही सल्ला दिला नाही किंवा जास्त काही न विचारता एकच प्रश्न विचारला, डॉक्टर जर तुमच्या पत्नीच्या आधी तुम्ही मरण पावले असते तर काय झाले असते?

**(क्रमशः)**

# ॥ ह्या प्लास्टिकचे करायचे काय? ॥

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

प्रवास करतांना आपण पहातो, शहराच्या बाहेर रस्त्याच्या दुतर्फा कसा कचरा पडला असतो. त्यात बहुतांशी प्लास्टिक पिशव्या, बाटल्यांचा खच असतो. पुणे, पिंप्री चिंचवड,मुंबई ,ठाणे,नासिक, नागपूर, औरंगाबाद,जळगांव, ह्या मोठ्या शहरासह अनेक जिल्ह्यात,ग्रामीण भागातही ही समस्या मोठया प्रमाणात भेडसावू लागली आहे.शहरी भागातला कचरा ग्रामीण भागाचे हद्दीत टाकला गेल्यामुळे अनेक आंदोलनही झालीत.अगदी मुख्यमंत्र्यांना त्यासाठी मध्यस्थी करावी लागली आहे. ह्या समस्येची तीव्रता त्यांनाही माहिती आहे.

शासनाने ५० मायक्राँन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यावर बंदी आणली. तसा कार्यक्रमही काही दिवस राबवला गेला. पुणे , मुंबई, ठाणे, पिंप्रीचिंचवड भागात काही हजार क्विंटल माल जप्त केला, लाखांनी दंड वसूल झाला. ग्रामिण भागातही काही प्रमाणात कार्यक्रम राबवला.पण तरीही आज बाजार पेठेत प्लास्टिक पिशव्यांचा वापर सर्रास सुरु आहे. पिशव्यांसाठी किंमत आकारुनही आपण त्या घेतो, कारण पर्यायी कागदी, कापडी पिशव्या बऱ्याच महाग पडतात, असे ग्राहकांचे म्हणणे आहे.काही अंशी ग्राहक म्हणजे आपणच त्याला कारणीभूत आहोत. जी परिस्थिती शहरी भागात तीच ग्रामीण भागात दिसून येते. रस्त्यारस्त्यावर पिशव्या,चहाचे ग्लास, गुठखा पुड्या, वापरलेल्या सलाईनच्या बाटल्या, दिसून येतात.. दवाखाने,व्यापारी पेठेत हे दृष्य हमखास दिसतेच. ठरवून दिलेले नियम पाळले जात नाही.

आज देशात प्लास्टिक निर्मितीचा उद्योग धंदा खूप पसरला आहे.किमान ३० ते ४० हजारावर युनिट असावे असा अंदाज आहे, त्यातून लाखो लोकांना रोजगार मिळतो. असे असले तरी –

✻ देशभरातील सिंगल युज ऑफ प्लास्टिक वापस आळा बसण्यासाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने एक महत्वपूर्ण निर्णय घोषित केला आहे त्यानुसार या निर्णयाची अंमलबजावणी सुरु झाली. सिंगलयूज प्लास्टिक वापर करणे उत्पादन करणे साठा करणे विक्री करणे यावर बंदी घालण्यात आली आहे




✻ प्लास्टिकच्या पिशव्यांचे जाडी ५० मायक्रोन होऊन वाढून ७५ मायक्रोन पर्यंत वाढवली आहे त्यानंतर ही जाडी १२० पर्यंत असणार आहे

✻ प्लास्टिकचे कप, ग्लास, सिगरेटच्या पाकिटावर असणारे प्लॅस्टिकचे आवरण, प्लास्टिकचे चमचे, केक कापण्यासाठी वापरात येणारे सुरी, चॉकलेट आणि आइस्क्रीम साठी वापरण्यात येणाऱ्या कांड्या, सजावटीसाठी वापरण्यात येणारे पॉलीस्ट्रीन, फुग्या साठी वापरात येणारा दांड्या, प्लास्टिकचे मिठाईचे डबे आदी वस्तूंचा समावेश आहे. कंपोस्टेबल प्लास्टिक यातून वगळण्यात आले आहे.

✻शासनाने, ठरवून दिलेल्या मायक्राँन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या निर्मिती वर बंदी घालून, अभियान अधिक प्रभावीपणे, कडक कारवाई करुन राबवायला हवे.

✻ग्रामपंचायत नगरपालिका, महानगरपालिका, पातळीवर या बाबतीत कडक कारवाई चे निर्देश द्यायला हवे.

✻केवळ शासनाचीच ही जबाबदारी नाही,पण नागरिक जर बेजबाबदार पणे, नियमबाह्य अशा पिशव्यांचा वापर करत असतील तर त्याना कायद्याचा बडगा दोघांनाही अर्थातच पिशवी देणारा व घेणारा दोघांनाही हवा.

✻शासनाने प्लास्टिक कचरा विघटनाचे संदर्भात अद्ययावत यंत्रणा उभी करायला हवी जेणे करुन हा कचरा वाढणार नाही.पर्यवरणाचा समतोल राखला जाईल. कचरा विघटनाची कार्य काही ठिकाणी सुरू आहे परंतु अधिक व्यापक प्रमाणावर ते व्हायला हवे तरच कचरा आटोक्यात येईल

✻प्रसारममाध्यमे,स्वयंसेवी संस्था, शिक्षण संस्थातून ह्याचा प्रचार प्रसार व्हायला हवा.

✻केलेला कायदा कसा राबवला जाईल, त्यासाठी तशी प्रत्येक टप्यावर प्रशासनातील कोणत्या अधिकाऱ्यांची काय जबाबदारी आहे,ते नक्की करायला हवे.आणि केली असेल तर अंमलबजावणी वर लक्ष ठेवायला हवे.

आणि औषध प्रशासन विभागाने ज्याप्रमाणें धडक कारवाई सुरू केली आहे तशाच प्रकारची कारवाई प्लास्टिकचा वापर, साठा याबाबतीत सुरू करावी. अखेर प्रश्न हा आहे की सरकार नागिरकांचे आरोग्या विषयी किती संवेदनशील आहे ? किती काळजी आहे.

काही लाख कोटीचा महसूल मिळतो म्हणून, दारु मुळे अनेकांची जीवन बरबाद होते,संसार धुळीला मिळतात


ह्या गोष्टी कडे डोळेझाक केलीच जाते ना? तीच बाब प्लास्टिक उद्योग धंद्याचे बाबतीत. लोकांचे आरोग्य बिघडणाऱ्या गोष्टी कडे दुर्लक्ष करायचे, नंतर आरोग्य शिबिरं राबवायची. दोन्हीही गोष्टींचा समतोल साधायला हवा.

शेवटी एकच महत्वाचे, नियमबाह्य मायक्राँन पेक्षा कमी जाडी प्लास्टिक पिशवी उत्पादन बंद,आणि ईतर प्लास्टिक विघटन करुन नष्ट करणे. हाच प्रभाची तोडगा आहे.तरच हे शक्य आहे,नाही तर हा कचरा वाढतच जाणार आहे... नियम कायदे हे तर केले जातात पण त्याची अंमलबजावणी होते का ? हाच महत्त्वाचा प्रश्न आहे . नाही तर हे प्रश्न कायम रहाणार आहेच...


ह्या प्लास्टिकच करायचं काय..???

# चैतन्यं – वेद, विज्ञान आणि जीवन

मुकुंद भालेराव, छत्रपती संभाजी नगर
विद्युतसंदेशसंकेतसूत्र –
bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाष्यक्रमांक – ८३० ८८ ३५३ १३



## गृहप्रवेश...



गृहप्रवेश शब्द उच्चारताच सर्वांच्या डोळ्यासमोर येतो नविन वास्तूतील प्रवेश. तो आनंददायक आहे यात तिळमात्रही शंका नाही. मला वाटते त्याच्या इतकीच दुसरी महत्वाची घटना जवळपास प्रत्येकाच्या आयुष्यात घडत असते व ती म्हणजे घरात पुत्रवधुचा प्रवेश. पुत्रवधु म्हणजेच कुलवधू अथवा स्नुषा किंवा सुनबाई.

कुलवधुचा गृहप्रवेश ही एक अत्यंत आनंददायक, शुभ व अविस्मरणीय घटना असते. दोन कुटुंबाना एकत्र आणण्याचा तो प्रत्यक्ष प्रसंग असतो. कन्यादानाच्या विधीपासून त्याची सुरुवात होते व तिच्या गृहप्रवेशाने प्रत्यक्ष संबंधाची गाठ घट्ट बांधण्याच्या क्षणापर्यंत पोहचते. घरात प्रवेश करून लक्ष्मीपूजन केले कि, मग अधिकृत शिक्कामोर्तब होते. त्या क्षणाला ती नवीन कुटुंबात पूर्णत्वाने प्रवेश करते. माझ्या मते याचा अर्थ असा मुळीच नाही कि, तिचा पितृगृहापासून पूर्णत: विच्छेद झाला आहे, तो तसा होऊही शकत नाही, किंबहुना तसा संबंध तुटणे अशक्य कोटीतील गोष्ट आहे. हां, हल्लीच्या राजकारणात मुलगी किंवा मुलीचे वडील स्वार्थापोटी खोटेखोटे बोलत सतत कि आमचा एकमेकांशी काहीही संबंध नाही, पण ते सारे खरे नसते. ते फसवे असते. आपला विषय वेगळा आहे, तेंव्हा आपण आपल्या विषयाकडे वळू पुन्हा.

आपला विषय आहे कुलवधू गृहप्रवेश. तिचा उंबरठ्यावरील तांदुळाचे माप लवंडून घरात प्रवेश खूप महत्वाचे असते. वास्तूत प्रवेश नसतो तो नुसता, तर घरातील पती, सासू, सासरे, नणंद वगैरे सर्वांच्या आयुष्यात प्रवेश असतो तो. सर्वांच्या भावविश्वाला एक वेगळे स्वरूप प्रदान करण्याचा प्रसंग असतो तो. घराच्या भिंतीतून एक आगळेवेगळे संगीत स्त्रवण्याची सुरुवात असते ती. वास्तुपुरुषाची मनोभावे आराधना करण्याचा प्रसंग असतो तो. घरातील प्रत्येक कणाकणाला क्षणोक्षणी आनंदित व माधुर्यमय करण्याची सुरुवात असते. पितृ गोत्रात्तून अनेक पिढ्यांपिढ्यांचे उत्तमोत्तम संस्कार त्याबरोबर प्रवेश करत असतात आपल्या घरात.

अनेक अपेक्षा व इच्छा मनात घेऊन ती प्रवेश करत असते. थोडी भीतीही असू शकते मनात. आशा तर असतेच. नवीन घराला नव्याने सुस्वरूप देण्याचे स्वप्न असते. लेक लाडकी पासून सून लाडकी पर्यंतचा प्रवास होण्याचा तो क्षण असतो कुलवधूचा गृहप्रवेश ! तिच्या पावलाने लक्ष्मीचा प्रवेश होत असतो व ती गृहलक्ष्मी बन असते आणि लक्ष्मी सम्राज्ञी असतेच. आपल्या सर्व गुणांनी संपूर्ण घराला पावित्र्य, सौंदर्य व शुचिर्भूत करण्याचा तिचा मानस असतो. जान्हवीच्या अवतरणाने जसे महीवरील मानवांना सतत अखंडितपणे शुद्ध करण्याचे महनीय कार्य ती भागीरथी करत असते, तसेच आपल्यां गृहप्रवेशाने तिच्या आयुष्याचे सार्थक होण्याचा तो मंगलमय प्रसंग असतो.

या सर्वांकरीता, घरातील प्रत्येकाने तिच्या भावनांचा आदर करायला हवा, सन्मान करायला हवा. तिच्या भावविश्वाला अत्यंत सहृदयतेने जपायला हवे, कारण ती वंशाच्या अखंडतेची पुण्यपावन प्रवाही भागीरथी बनणार असते, म्हणूनच भगवान मनूंनी

'यस्य नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता: ।'

असे म्हटले आहे आणि त्या श्लोकाचा दुसरा भागही तितकाच महत्वाचा आहे,

'यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ।।'

(मनुस्मृती ३.५६)

ज्या ठिकाणी स्त्रियांचा सन्मान व पूजन केले जाते, तेथे देवतांचा वास असतो (देवता प्रसन्न होतात). आणि ज्या ठिकाणी स्त्रियांचा सन्मान केला जात नाही, तेथील सर्व धार्मिक कर्मे व प्रयत्न निष्फळ ठरतात.

याच संदर्भातील पुढील श्लोकही तितकाच महत्वाचा आहे.

शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम्
न शोचन्ति तु यत्रैताः वर्धते तद्धि सर्वदा ।।

(मनुस्मृती ३.५७)

ज्या कुळातील स्त्रिया दुःखी असतात, ते कुळ लवकर नष्ट होते; आणि ज्या कुळातील स्त्रिया आनंदी व संतुष्ट असतात, ते कुळ नेहमी भरभराटीला येते.

इतके महत्व शास्त्रकारांनी स्त्रियांना दिलेले आहे. त्यातून स्नुषा तर आयुष्याचा खूप मोठा भाग पित्याच्या घरी घालविल्यानंतर ते सर्व सोडून नाव, गोत्र, निवास सर्व काही नव्याने स्विकारते व आता तेच आपले आयुष्य आहे हे मनोमन स्विकारते व जीवन व्यतीत करणार असते. त्यामुळे, इतका त्याग करणार्या कुल्वधुचा गृहप्रवेश हा उत्तमच व्हायला हवा नाही कां !

✻✻✻

# धाडसी क्रांतीकारक – मन्मथनाथ गुप्त

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

पुन्हा तुरूंगवासातून बाहेर आल्यावर मन्मथनाथ गुप्त यांनी जहाल लेखनाच्या माध्यमातून आपला लढा सुरु ठेवला. १९३९ मध्ये अटक होऊन पुन्हा १९४६ पर्यंत त्यांनी तुरुंगवास भोगला. याचा अर्थ असा कि, स्वातंत्र्य मिळण्याआधीच त्यांच्या आयुष्यातील जन्मापासूनच्या ३८ वर्षातील जवळपास २० वर्षे हलाखीचा तुरुंगवास त्यांनी भोगला. मन्मथनाथ गुप्त या क्रांतीकारकांचा वारसा तीन स्तरांवर महत्वाचा आहे. पहिला किशोरवयात स्वातंत्र्यलढ्यात झोलून देणारा निर्भय क्रांतीकारक, दुसरा तरूण वयात जवळपास वीस वर्षे सक्त मजुरीची शिक्षा भोगणारा आणि तुरूंगातही स्वातंत्र्यलढ्यासाठी दिशा देणारा स्वातंत्र्यसेनानी आणि तिसरा म्हणजे स्वातंत्र्यानंतरही इतिहासाला क्रांतीकारकांच्या दृष्टीने मांडणारा आत्मपरीक्षणाची प्रामाणिकता बाळगणारा संवेदनशील लेखक.

मन्मथनाथ गुप्त यांचा जन्म ७ फेब्रुवारी १९०८ रोजी वाराणसी येथे झाला. त्यांचे वडील वीरेश्वर गुप्त हे नेपाळमधील विराटनगर येथे शिक्षक होते. कुटुंबाचे मूळ उत्तर भारतातील सांस्कृतिक वातावरणाशी जोडलेले होते. घरातील शिस्त, शिक्षणाचे महत्व, वाचन आणि तत्कालिन राजकीय वातावरण यामुळे त्यांच्या बालमनावर लवकरच देशप्रेमाची छाप पडली. मन्मथनाथ यांच्या शालेय जीवनात भारतात असहकार आंदोलन, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, सभा आणि पत्रकवाटप यांमधून तरुणांमध्ये राजकीय जागृती होत होती. मन्मथनाथ यांनी वयाच्या १३ व्या वर्षी १९२१ साली युवराज एडवर्ड यांच्या भारतभेटीच्या पार्श्वभूमीवर बनारसमध्ये ब्रिटिश समर्थनार्थ कार्यक्रम आखले गेले होते अशा ठिकाणी बहिष्काराच्या पत्रकांचे वाटप केले. ही केवळ राजकीय कृती नव्हती तर मानसिक बंडखोरी होती. त्यासाठी त्यांना अटक होऊन तीन महिन्याचा तुरुंगवास भोगावा लागला. यानंतर त्यांचा राष्ट्रीय चळवळीशी संबंध दृढ होत ते काँग्रेसच्या महात्मा गांधी यांच्या ध्येयधोरणांकडे आकर्षित झाले आणि स्वयंसेवक म्हणून काम करू लागले. मात्र १९२२ मध्ये महात्मा गांधी यांनी चारचौरा पोलीस हत्याकांड प्रकरणी असहकार चळवळ मागे घेतल्यानंतर मन्मथनाथ गुप्त यांच्या तसेच इतर तरुणांच्या मनात निराशा निर्माण झाली मन्मथनाथ यांनाही त्यावेळेस अधिक ठाम, अधिक आक्रमक मार्ग स्वीकारावा असे वाटले.

याच काळात शचींद्र संन्यालांनी क्रांतीकारी गटांचे ऐक्य पूर्ण करून योगेशचंद्रांच्या व्दारे अनुशीलन समिती व आपला पक्ष यांच्यात पूर्ण एकात्मता प्रस्थापित करून हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन यानावाने नवीन क्रांतीपक्षाची प्रतिष्ठापना केली. शचींद्रनाथ संन्यालांनी या संस्थेची नवीन घटना तयार केली. कामकरी व शेतकऱ्यांना अधिकार देऊन शोषणहीन राज्पद्धतीचा या घटनेत पुरस्कार करण्यात आला होता. या असोसिएशनच्या शाखा उत्तर भारतातील प्रत्येक प्रांतातून काढण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्यात आला. या संघटनेत मन्मथनाथ गुप्त सामील झाले. हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशन मध्ये पंडित रामप्रसाद बिस्मिल, सुरेशचंद्र भट्टाचार्य, विष्णु शरण दुबलिस व राजेंद्र लाहिडी हे प्रमुख होते. मन्मथनाय गुप्त यांच्या संपादकत्वाखाली अग्रदूत नावाची एक गुप्त पत्रिकाही निघत असे. १९२५ च्या जानेवारी महिन्यात या संस्थेच्या वतीने (रिव्होल्यूशनरी) नावाने एक पत्रक साऱ्या हिंदुस्थानभर एकाच दिवशी वाटण्यात आले होते. या पत्रकाचे लेखक शचींद्रनाथ संन्याल होते पण पत्रकाखाली बलराज अशी स्वाक्षरी होती. या पत्रकाने सर्व हिंदुस्थानभर ब्रिटीशांविरुद्ध लोकमत संघटीत करण्यात आले. क्रांतीकारक चळवळीत मुरलेलेच लोक संस्थेत असल्यामुळे बॉब तयार करणे व नवीन शस्त्रास्त्रे मिळविणे यात ते कुशल होते. पण त्यासाठी आवश्यक तो धनसंचय मिळविण्यासाठी दरवडे घालणे हा एकच मार्ग उपलब्ध होता. रामप्रसाद बिस्मिल, रामकृष्ण खत्री, चंद्रशेखर आझाद, अशफकउल्ला, शचींद्र बक्षी व मन्मथनाथ गुप्त यांनी ९ मार्च १९२३ रोजी बिचपुरी येथे तर २५ डिसेंबर १९२४ रोजी रोशनसिंह, शचींद्र बक्षी, मन्मथनाय गुप्त, रामप्रसाद बिस्मिल व चंद्रशेखर आझाद यांनी बमशैली येथे आणि २४ मे १९२५ रोजी चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल, अशफकउल्ला, शचींद्र बक्षी, मन्मथनाथ गुप्त, मुकुंदीलाल यांनी व्दारकापूर येथे साहसपूर्ण दरवडे घालून पक्षाची नड भागविली.सर्व दरवड्यामध्ये मन्मथनाथ गुप्त हे सर्वात लहान असलेले १७ वर्षाचे क्रांतीकारक सहभागी होते. असोसिएशनच्या नेत्यांना यावेळी एका जहाजावरून गुप्त मार्गाने बराच शस्त्रसंग्रह मिळण्यासारखा होता. पण त्यासाठी कित्येक सहस्त्र रूपयांची आवश्यकता होती. प्रथम हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या सदस्यांनी आपली घरे धुऊन काढली. पण सा-याच निष्कांचनांजवळ निघणार काय विशेष? अशा कामाविषयी सहानुभूती असणाऱ्या लोकांकडून निधी गोळा करण्याचाही प्रयत्न झाला. पण त्याला फारसे यथ आले नाही. त्यामुळे शेवटी ही संधी हातची जाऊ नये म्हणून रामबरेली जिल्ह्यातील सराय महेश नावाच्या



गावात राजनैतिक दरवडाही घालण्यात आला. पण आवश्यक तितके पैसे त्यातूनही जमा न झाल्याने पं.रामप्रसाद बिस्मिल यांच्या योजनेप्रमाणे सरकारी पोस्ट ऑफिसचा रेल्वेतून नेण्यात येणारा खजिना काकोरी स्टेशनजवळ पं.रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्लाखाँ, राजेन्द्र लाहिडी, शचीन्द्रनाथ बक्षी, मुकुंदीलाल, मन्मथनाथ गुप्त, मुरारी वर्मा, बनवारीलाल, चंद्रशेखर आझाद यांनी ९ ऑगस्ट १९२५ रोजी लुटला. लखनौजवळील काकोरी स्टेशनजवळ रेलवे थांबवून लुटलेल्या खजिन्यावेळी मन्मथनाथ गुप्त यांची पिस्तुलमधून मारलेली गोळी लागून अहमद अली नावाच्या प्रवाशाचा तो रेल्वेतून पळून जात असताना मृत्यू झाला. यामुळे या घटनेचे संपूर्ण स्वरूप बदलून ज्याला सुरवातीला राजकीय लूट मानले गेले असते तो खटला हत्या, कटकारस्थान आणि देशद्रोहाच्या आरोपांनी अधिक गंभीर झाला.

भारतीय क्रांतीकारी इतिहासातील अत्यंत गाजलेली रेल्वे थांबवून सरकारी खजिना ताब्यात घेण्याची ही घटना ठरली. ब्रिटिश साम्राज्याला आव्हान देणाऱ्या या घटनेने ब्रिटिश साम्राज्याने प्रचंड पैसा, बळ खर्च करून २८ आरोपींवर खटला भरला. चंद्रशेखर आझाद शेवटपर्यंत सापडले नाहित. या आरोपीतांवर सम्राटाविरुध्द युद्ध घोषित करणे, कट करणे, हत्या करणे, दरवडे घालणे हे आरोप होते. या खटल्यात आरोपीच्या वतीने पं. गोविंदवल्लभ पंत, बी.के. चौधरी, मोहनलाल सक्सेना व चंद्रभान गुप्त हे काम चालवीत होते. सरकारच्या वतीने २५० साक्षीदार यात होते आणि दहा लक्षांहून अधिक खर्च सरकारला करावा लागला. रामप्रसाद बिस्मिल, अशफाकउल्ला खान,रोशनसिंग आणि राजेंद्र लाहिरी यांना फाशी झाली. मन्मथनाथ गुप्त यांचे वय १८ वर्ष भरत नसल्याने मृत्यूदंडातून ते वाचले आणि त्यांना १४ वर्षाची सक्तमजुरी शिक्षा झाली. कारावास हा मन्मथनाथ यांच्या जीवनातील महत्वाचा अध्याय होता. तुरूंगात त्यांनी शारीरिक हाल अपेष्टा, मानसिक दडपण आणि एकाकीपण अनुभवले. ब्रिटिश तुरूंगव्यवस्थेतील कठोरता, राजकीय कैद्यांवरील वागणूक आणि अन्यायकारक व्यवस्था याविरुद्ध त्यांनी तुरूंगातही उपोषणाच्या माध्यमातून लढा दिला.




१९३७ मध्ये कारावासातून बाहेर आल्यावर मन्मथनाथ यांनी पुन्हा सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. लेखनाच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढा सुरु ठेवला. क्रांतीकारी चळवळीचा इतिहास, संघटनात्मक तपशील आणि स्वातंत्र्यसंग्रामातील वैचारिक संघर्ष यांची नोंद ठेवायला सुरवात केली. ही नोंद भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील संग्रामाची ऐतिहासिक आहे जी भारताच्या नव्या पिढीसाठी अमूल्य आहे. १९३९ मध्ये त्यांना पुन्हा अटक झाली आणि त्यांनी १९४६ पर्यंत तुरूंगवास भोगला. तुरूंगातून बाहेर येऊनही त्यांनी क्रांतीला केवळ सस्त्रांच्या भाषेत नव्हे तर साहित्य, इतिहास, समाजशास्त्र आणि संपादनाच्या माध्यमातून समजाऊन घेतले. मन्मथनाथ गुप्त हे फक्त क्रांतीकारक नव्हते तर अत्यंत फलदायी लेखकही होते. त्यांनी हिंदी, इंग्रजी आणि बंगाली या भाषांमध्ये विपुल लेखन केले. त्यांची ग्रंथसंपदा प्रचंड असून जवळपास १०० ग्रंथ त्यांनी लिहिले. आत्मचरित्र, क्रांतीकारकांचा इतिहास, राजकीय विश्लेषण, लघुकथा आणि वैचारिक लेखन याचा या लेखनात समावेश आहे. ब्रिटिश सरकारने नोंदविलेला इतिहास आणि क्रांतीकारकांनी अनुभवलेला इतिहास यात जी मोठी दरी होती ती भरून काढण्याचे काम त्यांनी त्यांच्या लेखनातून करीत स्वातंत्र्यलढ्यातील शहीद झालेल्या, तुरूंगवास भोगलेल्या क्रांतीकारकांना ऐतिहासिक नोंदीत न्याय मिळवून दिला. स्वातंत्र्यानंतरच्या काळात मन्मथनाथ गुप्त यांनी कम्युनिस्ट पक्षाशी संबंध ठेवला आणि सामाजिक-राजकीय विचारमंथनात भाग घेतला. त्यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाशीही काम केले. योजना, बालभारती, आजकल यासारख्या नियतकालिकांचे संपादन करून नव्या भारताच्या सांस्कृतिक आणि बौध्दिक जडणघडणीत हातभार लावला. वाचकांची वैचारिक भूक आणि भाषिक आभिरूची संपादक म्हणून त्यांनी घडवली. मन्मथनाथ गुप्त यांनी क्रांतीकारक चळवळीचे गौरवीकरण करतानाच तिच्या मर्यादाही प्रामाणिकपणे नोंदविल्या. काकोरी कांडातील एका निष्पाप व्यक्तीच्या मृत्यूबद्दल त्यांनी आयुष्याच्या उत्तरार्धात पश्चातापही व्यक्त केला. ही प्रामाणिकता दुर्मिळ आहे. कारण ऐतिहासिक व्यक्तिमत्वे आपला भूतकाळ उजळवून दाखवतात परंतु मन्मथनाथ गुप्त यांनी आत्मपरीक्षणाची भूमिका घेतली.

मन्मथनाथ गुप्त यांचे आयुष्य पत्रकारितेसाठीही महत्वाचे आहे. पत्रकारिता म्हणजे केवळ घटनांचे वृत्तांकन नव्हे, तर काळाच्या नोंदी ठेवणे. त्यांनी जे केले ते एका अर्थाने ऐतिहासिक पत्रकारितेचे कार्य होते. त्यांनी खोट्या गौरवगाथेऐवजी वास्तव मांडले. संघर्षाच्या घटनांना वैचारिक चौकट दिली आणि क्रांतीकारक अनुभवांना शब्दरूप दिले. त्यामुळे मन्मथनाथ गुप्त यांचे जीवन हे पत्रकार, लेखक आणि इतिहासप्रेमी यांच्यासाठी एकाचवेळी प्रेरणादायी ठरते. २६ ऑक्टोबर २००० रोजी नवी दिल्ली येथे त्यांचे निधन झाले. ९२ वर्षाचे दीर्घायुष्य त्यांना लाभले. आयुष्याच्या अखेरपर्यंत मन्मथनाथ गुप्त हे स्मृती, विचार आणि लिखाणाच्या माध्यमातून सक्रीय होते. त्यांच्या मृत्यूसोबत भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एका महत्वपूर्ण साक्षीदाराची जीवनयात्रा संपली. त्यांनी दिलेली साक्ष, लिहून ठेवलेला इतिहास आणि अनुभवलेला संघर्ष आजही जिवंत आहे. आज थोर स्वातंत्र्यसेनानी मन्मथनाथ गुप्त यांचे नाव घेतले की एकाचवेळी क्रांती, लेखणी, तुरूंग आणि आत्मपरीक्षण ही चार रुपे आठवतात त्यांचे जीवन हे एक साधे चरित्र नाही, तर भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीचा जिवंत दस्ताऐवज आहे. मन्मथनाथ गुप्त यांच्याकडे पाहताना एक गोष्ट ठळकपणे जाणवते ती म्हणजे स्वातंत्र्यलढा हा केवळ राजकीय संघर्ष नव्हता, तर तो बौध्दिक, नैतिक आणि मानवी मुल्यांच्या शोधाचा प्रवास होता. या स्वातंत्र्यलढ्यात काहीजण शस्त्राने लढले, काहीजण विचारांनी, काहीजण लेखणीने. मन्मथनाथ गुप्त या तिन्ही पातळीवर लढलेले थोर स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांचे जीवन भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील महत्वाचे, अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559